# बृ. म. मं मराठी शाळा बातमी



बीएमएम सचिव विद्या जोशी या जून २०१८ मध्ये भारत दौऱ्यावर असताना माननीय शिक्षणमंत्री विनोद तावडे याना भेटण्याचा योग आला. त्यांना बीएमएम च्या मराठी शाळेची सविस्तर माहिती दिली. परदेशात मराठी भाषेसाठी असलेली आस्था आणि तळमळ बघून ते नुसतेच आनंदित झाले नाहीत तर त्यांनी जागतिक पातळीवर मराठी भाषेच्या प्रसारासाठी लागेल ती मदत करेन असे आश्वासन दिले.



महाराष्ट्रात इंग्लिश माध्यमांच्या शाळांमधून मराठी भाषा ही दुसरी किंवा तिसरी भाषा म्हणून शिकवली जाते. शिक्षणमत्रांनी बीएमएम मराठी शाळेने तयार केलेला मराठी भाषेचा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील इंग्लिश शाळांसाठी वापरता येईल का यावर संक्षिप्त चर्चा केली. तसेच बीएमएम मराठी शाळेच्या मराठी भाषा ऑनलाईन शाळा उपक्रमासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले.

© Copyright. Material used by participant BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.



बीएमएम सचिव विद्या जोशी यांनी भारती विद्यापीठ, पुणे येथे सहकार्यवाह डॉ. सगरे आणि माननीय दिवंगत श्री पतंगराव कदम यांच्या पत्नी यांची ही भेट घेतली.

© Copyright. Material used by participant BMM Marathi Shala only.

All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.